| | |
|---|---|
| **MHKO160000052021** | नियमित दिवाणी दावा ०२/२०२१ मधील नि.क्र. २१ खालील आदेश |

१. वादीं यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश २६ नियम ९ अन्वये कोर्ट कमिशनर यांची नेमणूक होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांनी केलेले अतिक्रमण काढून त्या क्षेत्राचा प्रत्यक्ष व खुला कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी कथन केले की, त्यांनी दि.१४/०२/२०१८ रोजी दावा मिळकतीची मोजणी होऊन मिळणेसाठी अर्ज केला होता व त्याप्रमाणे दि.२३/१०/२०१८रोजी दावा मिळकतीची मोजणी होऊन त्याच दिवशी दावा मिळकतीच्या हद्दी दाखविल्या, त्यामध्ये प्रतिवादी नं १ व २ यांनी दावा मिळक्त न.भू.क्र.४३२ मध्ये दक्षिणेकडून उत्तरेकडे १२० चौ.फूट इतक्या क्षेत्रात अतिक्रमण केलेचे दाखविले आहे व प्रतिवादी नं ३ यांनी पश्चिम बाजूकडून पूर्व बाजूकडे ४५ फूट इतक्या क्षेत्रात अतिक्रमण केलेचे दाखविले आहे. सदरचा नकाशा नि.३ सोबत अ.नं.२ ला हजर केला आहे. सदरचे नकाशामध्ये मोजणी करणार याने प्रतिवादी नं १ ते ३ यांनी किती क्षेत्रात अतिक्रमण केले आहे हे लिहीलेले नाही. तसेच दावा दाखल केलेनंतर प्रतिवादी यांनी वीचे मालकीचे दावा मिळकतीमध्ये आणखि जादा क्षेत्रात अतिक्रमण केले आहे. त्यामुळे प्रतिवादी नं १ ते ३ यांनी नेमके किती क्षेत्रात अतिक्रमण केले आहे ते क्षेत्र मोजणी करून रेकॉर्डवर आणणेसाठी वादी यांनी मा. कोर्ट कमिशनर यांचेमार्फत मोजणी होणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला असून तो मंजूर करण्याची विनंती केली.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल न केलेने सदरकामी त्यांचेविरूध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत करणेत आला आहे.

३. मी वादीं यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीं, प्रतिवादीं यांचे अभिलेखावरील वादपत्र, सोबत जोडलेले कागदपत्रे यांचे अवलोकन केले आहे. वादीं यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांनी केलेले अतिक्रमण काढून त्या क्षेत्राचा प्रत्यक्ष व

खुला कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीं यांनी कथन केले की, त्यांनी दि.१४/०२/२०१८ रोजी दावा मिळकतीची मोजणी होऊन मिळणेसाठी अर्ज केला होता व त्याप्रमाणे दि.२३/१०/२०१८रोजी दावा मिळकतीची मोजणी होऊन त्याच दिवशी दावा मिळकतीच्या हद्दी दाखविल्या, त्यामध्ये प्रतिवादी नं १ व २ यांनी दावा मिळकत न.भू.क्र.४३२ मध्ये दक्षिणेकडून उत्तरेकडे १२० चौ.फूट इतक्या क्षेत्रात अतिक्रमण केलेचे दाखविले असून प्रतिवादी नं ३ यांनी पश्चिम बाजूकडून पूर्व बाजूकडे ४५ फूट इतक्या क्षेत्रात अतिक्रमण केलेचे दाखविले आहे. तथापि, नकाशामध्ये मोजणी करणार याने प्रतिवादी नं १ ते ३ यांनी किती क्षेत्रात अतिक्रमण केले आहे हे लिहीलेले नाही. तसेच दावा दाखल केलेनंतर प्रतिवादी यांनी त्यांचे मालकीचे दावा मिळकतीमध्ये आणखि जादा क्षेत्रात अतिक्रमण केले आहे. प्रतिवादीं यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल न केलेने सदरकामी त्यांचेविरूध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत करणेत आला आहे. त्यामुळे वादींचे अर्जातील कथने खरी व ग्राह्य समजण्यात येतात. वादीं, प्रतिवादीं यांचे दरम्यानचा मुख्य वाद निकाली करण्यासाठी, दावा मिळकतीमधील वस्तुस्थिती अभिलेखावर येण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरणार आहे. प्रतिवादीं यांनी अतिक्रमण केले आहे अथवा नाही, केले असल्यास नेमके किती क्षेत्रात अतिक्रमण केले यासाठी मा. कोर्ट कमिशनर यांचे सुस्पष्ट अहवालाची सदरकामी गरज आहे. निरनिराळे वाद टाळण्यासाठी एकाच दाव्यात दोन्ही पक्षकारांचे सर्व वादमुद्दे निकाली काढणे गरजेचे आहे. सबब, वर नमूद निष्कर्शास अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.२१ मंजूर करण्यात येत आहे.

२. मा. उपअधिक्षक, भूमि अभिलेख, शाहुवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

३. मा. कोर्ट कमिशनर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी वादीं आणि प्रतिवादीं यांना पूर्व नोटीसा देवून पिशवी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर येथील नगर भूमापन क्र ४३२, क्षेत्र २१०९ चौ.मी. या मिळकतीची मोजणी करून दावा मिळकतीच्या हद्दीच्या खुणा निश्चित कराव्यात आणि त्या नकाशामध्ये दर्शविण्यात

याव्यात.

४. मा. कोर्ट कमिशनर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी दावा मिळकत नगर भूमापन क्र ४३२, क्षेत्र २१०९ चौ.मी. ची मोजणी करून दावा मिळकतीमध्ये प्रतिवादीं यांनी अतिक्रमण केले आहे अथवा नाही, केले असल्यास किती क्षेत्रात अतिक्रमण केले याचा सुस्पष्ट अहवाल नकाशासह सादर करावा.

५. वादीं यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी मा. कोर्ट कमिशनर यांची कमिशन फि त्यांचे कार्यालयात जमा करावी.

६. वादीं आणि प्रतिवादीं यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी मा. कोर्ट कमिशनर यांना कमिशन कामी आवश्यक ती मदत करावी.

७. येणेप्रमाणे कमिशन रिट अदा करण्यात यावेत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by
Amol Shriram Shinde
Date: 2023.03.03
10:55:30 +0530

दिनांक – ०२/०३/२०२३ ( अमोल श्रीराम शिंदे )

स्थळ- शाहूवाडी दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

मलकापूर- शाहूवाडी, जि. कोल्हापुर